महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257-2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

क्र दंडप्र-01/कावि/2020/544

दिनांक 03 डिसेंबर, 2020

**विषय :- खुले लॉन्स, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय / हॉल / सभागृह या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्याबाबत..**

## परिपत्रक :-

जळगांव जिल्हयात करोना विषाणूचा (कोव्हिड-19) वाढता प्रादुर्भाव व कोव्हिड-19 ॲक्टीव रुग्णांची संख्या लक्षात घेता, जिल्हा प्रशासनामार्फत अनेक प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविल्या जात आहेत. सदर प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून वेळोवेळी शासनामार्फत तसेच जिल्हा प्रशासनामार्फत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तथापि व्याख्याने, मेळावे, मुलाखती, संस्थांच्या सर्वसाधारण सभा व अन्य अनुषंगिक कार्यक्रम आयोजित करण्याकरीता परवानगी मिळण्याबाबत मोठया प्रमाणात जिल्हादंडाधिकारी कार्यालयात अर्ज/ निवेदने प्राप्त होत आहेत. यापार्श्वभुमीवर वर नमूद कार्यक्रम आयोजित करण्याकरीता खालील प्रमाणे सूचना सर्व संबंधितांना निर्गमित करण्यात येत आहे.

1) खुले लॉन्स, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय / हॉल / सभागृह अशा ठिकाणी व्याख्याने, मेळावे, मुलाखती, संस्थांच्या सर्वसाधारण सभा व अन्य अनुषंगिक कार्यक्रमांचे आयोजन **केवळ 50 लोकांच्या** मर्यादेत करता येईल.

2) वर नमूद केल्यानुसार संबंधित कार्यक्रम आयोजित करण्यासाठी या कार्यालयाकडून व अन्य कोणत्याही विभागाकडून वेगळी परवानगी घेण्याची आवश्यकता राहणार नाही.

3) सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी पारंपारीक वाद्यवृंदाचा वापर करीत असतांना ध्वनी प्रदूषण (नियम व नियंत्रण) नियम, 2000 मधील नमूद बाबींचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता संबंधितांनी घ्यावी. तसेच सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे मिरवणूक काढता येणार नाही.

4) जळगांव जिल्हयात घोषित करण्यात आलेल्या व वेळोवेळी घोषित होणा-या Containment Zone मध्ये खुले लॉन्स, विना वातानुकूलीत मंगल कार्यालय / हॉल / सभागृह तसेच घर व घराच्या परिसरात वर नमूद केलेल्या कार्यक्रमानुसार कोणतेही कार्यक्रम आयोजित करण्याची परवानगी अनुज्ञेय असणार नाही.

5) सदर कार्यक्रम स्थळी उपस्थित नागरीकांनी चेह-यावर मास्क लावणे, सॅनिटाईजर्सचा वापर करणे बंधनकारक राहील व संबंधितांकरीता हात धुण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी आयोजक यांची राहील.

6) वर नमूद केल्यानुसार कार्यक्रमाचे आयोजकांनी कोव्हिड-19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशांचे पालन करणे आवश्यक राहील.

वरील सुचनांचे पालन न केल्यास सर्व संबंधितांवर आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 व भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 नुसार कारवाई करण्यात येईल, याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

(अभिजीत राऊत)
जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
5. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
6. मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद सर्व

**प्रत** :-जिल्हा माहिती अधिकारी जळगांव यांनी सदर परिपत्रकास स्थानिक वर्तमानपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी द्यावी.

**प्रत** :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव यांनी सदरील परिपत्रकाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.